शिधावाटप/रास्तभाव दुकानांच्या परवाना व तद्नुषंगीक इतर दस्तावेजांच्या शुल्कामध्ये आणि अनामत रकमेमध्ये सुधारणा करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय, क्रमांक: साविव्य-१०९७/प्र.क्र.८०३८/ना.पु.२८
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : 20 डिसेंबर, १९९७.

प्रस्तावना :- सार्वजनिक वितरण व्यवस्था, अधिकृत शिधावाटप / रास्त भाव दुकानदार यांच्यामार्फत राबविली जाते. मुंबई शिधावाटप क्षेत्रात शिधावस्तूंची उचल थेट दुकानदार किंवा दुकानदारांच्या संघटीत संस्था शासकीय गोदामातून तसेच नॉमिनीकडून करतात. मात्र राज्याच्या उर्वरित भागात शिधावस्तूंची उचल थेट रास्तभाव दुकानदारांमार्फत केली जाते. शिधावस्तूंची विक्री शिधापत्रिकाधारकांना करण्यासाठी अधिकृत शिधावाटप/रास्तभाव दुकानदारांना प्राधिकारपत्रे दिली जातात. मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानदार व त्यांच्या संघटीत संस्था यांना महाराष्ट्र अन्नधान्य वाटप [द्वितीय] विनियम, १९६६ च्या विनियम १०[१] अन्वये आणि राज्याच्या उर्वरित भागातील रास्तभाव दुकानदारांना महाराष्ट्र अनुसूचित वस्तू [वितरणाचे विनियमन] विनियम, १९७५ च्या विनियम ११[१] अन्वये, विहित केलेल्या नमूना ७ प्रमाणे, तर संघटीत संस्थांना ७-अ प्रमाणे प्राधिकारपत्र द्यावयाचे असते. अधिकृत शिधावाटप/रास्तभाव दुकानाचे प्राधिकारपत्र शुल्क, नूतनीकरण शुल्क व दुय्यम प्राधिकार पत्रासाठीचे शुल्क १९७६ मध्ये निर्धारित केलेले आहे. सदरचे शुल्क निर्धारित करून आता २१ वर्षांचा कालावधी उलटून गेला आहे. या प्रदिर्घ कालावधीत या विविध शुल्कांमध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. मात्र या कालावधीत प्रशासकीय खर्चामध्ये फार मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. सबब, शासनाने प्राधिकारपत्रांच्या शुल्कात वाढ करण्याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे :-

शासन निर्णय :- प्रस्तावनेत नमूद केलेल्या सांविधिक आदेशानुसार द्यावयाच्या अधिकृत शिधावाटप दुकानदार, त्यांच्या संघटीत संस्था व रास्तभाव दुकानदाराचे प्राधिकारपत्र शुल्क; नुतनीकरण शुल्क व दुय्यम प्राधिकारपत्राचे शुल्क सुधारीत करून ते आता पुढीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे :-

| | |
|---|---|
| १] अधिकृत शिधावाटप / रास्त भाव दुकानाच्या व त्यांच्या संघटीत संस्थांच्या प्राधिकार पत्राचे/परवान्याचे शुल्क. | रु. १००.०० |

हाधिकारी कार्यालय रत्नागिरी.
24 DEC 1997

9846
FPS
30/12/97

कृ.मा.प...

२] परवान्याचे/प्राधिकारपत्राचे नुतनीकरण शुल्क रु. २०.०० [प्रति वर्षासाठी]
[तीन वर्षासाठी
रुपये ६०/-]

३] दुय्यम [डुप्लीकेट] प्राधिकारपत्र/परवाना शुल्क रु. ५०.००

२. वर नमूद केलेले अनुक्रमांक [१] व [३] येथील सुधारीत दर व प्राधिकारपत्राचे नुतनीकरण दर दिनांक १ जानेवारी, १९९८ पासून लागू करण्यात येत आहेत.

३. सार्वजनिक वितरण व्यवस्था राबविण्यासाठी प्राधिकारपत्रे देतेवेळी अधिकृत शिधावाटप/रास्तभाव दुकानदारांनी प्राधिकारपत्रात नमूद केलेल्या शर्तीचे पालन करणे आवश्यक असते. त्यासाठी त्यांच्याकडून अनामत रकमा घेतल्या जातात. शासन निर्णय क्र. साविव्य-१०९२/२४६७/प्र.क्र.६५२६/ना.पु.२८, दिनांक ३ जानेवारी, १९९६ अन्वये अशा विहित केलेल्या अनामत रकमांच्या दरात सुधारणा करुन ते आता पुढीलप्रमाणे विहित करण्यात येत आहेत:-

| | |
|---|---|
| १] मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रातील सर्व अधिकृत शिधावाटप दुकानदार | रु. ५०००/- |
| २] इतर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व रास्तभाव दुकानदार | रु. ३०००/- |
| ३] इतर नागरी क्षेत्रातील सर्व रास्तभाव दुकानदार | रु. २०००/- |
| ४] ग्रामीण क्षेत्रातील सर्व रास्तभाव दुकानदार | रु. १०००/- |

४. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या व विमुक्त जमातीमधील दुकानदारांकडून आणि सहकारी संस्थांकडूनही वरील विहित दरानेच अनामत रक्कम घेण्यात यावी. हे सुधारीत दर दिनांक १ जानेवारी १९९८ पासून नव्याने प्राधिकारपत्र देताना लागू करावेत. तसेच ज्या अधिकृत शिधावाटप/रास्तभाव दुकानदारांना यापूर्वीच प्राधिकारपत्रे दिलेली आहेत, त्यांना यापुढे ज्यावेळी प्राधिकारपत्राचे नूतनीकरण करण्यात येईल, त्यावेळी उपरोक्त सुधारीत दर लागू करण्यात यावेत.

५. उपरोक्त बदलांच्या अनुषंगाने सांविधिक आदेश/विनियमामध्ये आवश्यक सुधारणा करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ वि. ना. मोरे ]
उप सचिव
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी [मुंबई शहर व उपनगर जिल्हा वगळून]
सर्व विभागीय पुरवठा उप आयुक्त,
सर्व अतिरिक्त जिल्हाधिकारी
नियंत्रक शिधावाटप, मुंबई.
सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी